**प्रेस नोट दि. २४/०३/२०१९**

**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**

**शिवाजीनगर पो स्टे कडील पोलीसांनी तक्रारदार यांची रक्कम तातडीने मिळवुन दिलेबाबत.**

श्रीप्रकाश मुळे,रा. पुणे यांनी दि.१५/०२/२०१९ रोजी माहुरगड,जि.नांदेड येथे जाण्यासाठी शिवाजीनगर एस.टी. स्टॅन्ड कडील एका ट्रॅव्हल्स कंपनीकडुन जाण्या-येण्याकरीता किंमत रुपये ६,४००/- रुपयेची तिकीटे काढलेली होती. परंतु प्रवासाचे दिवशी सदर ट्रॅव्हल्स कंपनीने नियोजित वेळेमध्ये गाडी उपलब्ध न करुन दिल्याने तक्रारदार प्रकाश मुळे यांची गैरसोय झाली. त्यामुळे त्यांनी दुसऱ्या ट्रॅव्हल्स एजन्सीकडुन तिकीटे काढुन माहुर जिल्हा नांदेड येथे प्रवास केला.

दि.०१/०३/२०१९ रोजी तक्रारदार हे पोलीस ठाणे येथे आल्यानंतर त्यांनी घडलेल्या प्रकाराबाबत माहिती दिली व विलाक्षी ट्रव्हल कंपनीचे लोक हे पैसे देत नसल्याबाबत सांगितल्याने,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,बाळासाहेब कोपनर यांनी पोलीस उप-निरीक्षक,कुमार पाटील, पोशि.राहुल होळकर, पो.ना. श्रीकांत सांवत यांना तात्काळ तक्रारदार यांचेसोबत जाणेबाबत सांगुन मार्गदर्शनपर सुचना दिल्या. त्याप्रमाणे वरील नमुद अधिकारी व कर्मचारी यांनी नमुद ट्रॅव्हल्स कंपनीचे कार्यालयात जावुन तक्रारदार यांचे ६,४००/- रुपये परत मिळवुन दिलेले आहेत. त्याबाबत तक्रारदार यांनी प्रशंसा व आभारपत्र पोलीस ठाणेस दिलेले आहे.

वरील नमुद कारवाई ही बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक,शिवाजीनगर पो स्टे पुणे शहर, पोउनि.कुमार पाटील, पोना श्रीकांत सावंत, पोशि.राहुल होळकर यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर